ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | श्रीयुत रा. रा. वामन प्रभाकर परांजपे यांचें चरित्र |
| लेखक | : | वामन विश्वनाथ जोशी |
| प्रकाशक | : | आर्यभूषण छापखाना, पुणे |
| प्रकाशन वर्ष | : | १९०० |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

श्रीयुत रा॰ रा॰

# वामनराव प्रभाकर परांजपे

यांचें चरित्र.

श्रीयुत रा० रा०

# वामन प्रभाकर परांजपे

## यांचें चरित्र.

लिहिणार

**वामन विश्वनाथ जोशी,**

दुय्यम चिटणीस, विधवाविवाहप्रतिबंध निवारक मंडळी, पुणें.

---

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

इसवी सन १९००

# अर्पण पत्र.

## स्त्रीपुनर्विवाह-

आपद्धर्मास साह्य करणार

नीतिधैर्ययुत सर्व बंधुभगिनींस त्यांच्या

दयाळुपणाबद्दल ही पोथी

अर्पण करितों,

**वा. वि. जोशी.**

निराश्रित बालविधवांचीं पुनर्लग्नें लावून देऊन त्यांस आश्रय देणें युक्तिदृष्ट्या योग्य व परोपकाराचें काम खरें, पण हीं लग्नें धर्मदृष्ट्या निंद्य होत असा एकंदर लोकांचा समज असल्यामुळें व रूढीचीही अनुकूलता नसल्यामुळें पुनर्लग्न करण्याचें कोणाच्या मनांत असलें तरी सहसा साहस करवत नाहीं. पुनर्विवाह करणारांस अनेक अडचणी आहेत. ते ज्ञातीबाह्य समजले जातात. त्यांस लोकछळ सोसावा लागतो, गणगोतास अंतरावें लागतें. असे अनेक प्रकार आहेत. व ह्या त्रासदायक गोष्टी आज ३० वर्षांपूर्वीं फारच नडत असत. त्या सुधारणा प्रतिकूल दिवसांत ज्यांनीं ह्या कार्याबद्दल पुढाकार घेतला अशांच्या गोष्टी आजकालच्या लोकांस वाचावयास मिळाल्या असतां बराच उपयोग होईल, अशी पुढील गोष्ट लिहिणाराची

आशा

परिपूर्ण कर्ता परमेश्वर.

# श्रीयुत रा० रा० वामनराव परांजपे यांचें अल्प चरित्र.

जें महत्कार्य मोठ्या विद्वान् अगर श्रीमान् गृहस्थांसही करण्यास अति संकटावह होतें तेंच महत्कार्य केव्हां केव्हां साधारण अडाणी व गरीब मनुष्यें सहज लीलेनें पार पाडतात. मात्र त्यांस नीतिधैर्याचें चांगलें पाठबळ असलें ह्मणजे झालें. बहुतेक गोष्टींत इतर गुणांपेक्षां किंवा साधनांपेक्षां नीतिधैर्याची अनुकूलताच अधिक उपयोगी पडते. नाहीं तर इतर सर्व व्यवस्था अनुकूळ असून केवळ या गुणाच्या अभावामुळें पुष्कळ सत्कार्यें अजिबात राहून जातात. सबब नीतिधैर्य मनुष्याच्या ठायीं असणें फार महत्वाचें आहे. हें ज्यांच्या अंगीं वसत आहे अशा थोर पुरुषांत रा. रा. वामनराव परांजपे यांची गणना करणें योग्य आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यामध्यें मिठगावणें ह्मणून एक लहानसा गांव आहे. तेथें वामनरावांचा जन्म शके १७४८ त झाला.

ह्यांना आपल्या जन्मभूमीचा सहवास असा पहिलीं ६।७ वर्षेंच काय तो घडला. वामनरावांचे चुलते वे. रा. दिवाकर भट परांजपे हे श्रीवर्धनास रहात होते. येथें वामनरावांचे मामांनीं त्यांस पोंहोंचविलें. तेथें हे २ वर्षें होते. तदनंतर ह्यांनीं वें गांव सोडिलें तें सोडिलेंच. अद्यापपावेतों फिरून कधीं हे तिकडे गेले नाहींत. वामनरावांचें लहानपणचे शिक्षणास मुंबईजवळ पनवेल गांवीं सुरुवात झाली. ह्यांचे वाडवडिलांचा धंदा भिक्षुकीचा होता. त्यांचे शेजारीपाजारी लोक त्यांस फार मान देत असत, व इष्टमित्र मंडळींत त्यांची मोठी प्रतिष्ठा असे. लहानपणीं वामनरावजींस इंग्रजीचें ज्ञान संपादण्याविषयीं फार हौस वाटे. ह्यांनीं ह्मणावें कीं इंग्रजी शिकावयास सांपडेल तर फार मौज होईल. पण ही त्यांची मनीषा परिपूर्ण होण्यास पनवेलीस सोय नव्हती. सबब हे शिकण्याचे हेतूनें पुण्यास येऊन पोहोंचले. ह्यांचे मनोदयानुरूप इंग्रजी विद्याभ्यास करण्यास येथें त्या वेळीं पुष्कळ चांगल्या सोयी होत्या. सबब वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें हे सन १८४० मध्यें पुण्यास येऊन राहिले. ह्यांनीं मराठी व इंग्रजी भाषांचा अ-

भ्यास मोठ्या सपाट्यानें सुरू केला. त्या काळीं या पुणें शहरीं हुशारी, चपळाई, बुद्धीची प्रखरता इ० गुण प्रदर्शित करण्यास उत्तम तऱ्हेची सवड सांपडे. युरोपियन साहेब शिक्षक एतद्देशीयांच्या गुणांचे चहाते असत. चलाख व बुद्धिवान् विद्यार्थ्यांचें त्यांस मोठें कौतुक वाटे.

योग्य सुशिक्षित मनुष्यांची प्रशंसा करून साहेब लोक त्यांस प्रोत्साहन देत. अशा थोर मनाच्या मायाळू शिक्षकांच्या छत्राखालीं त्याकाळीं जो छात्रवर्ग एक वेळ तयार झाला, त्या तोडीचा छात्रवर्ग हल्लींपावेतों तयार होत नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. असो. रे० जेम्स मिचेल व डा० मरे मिचेल हे थोर व विद्वान साहेब अध्यापक असतांना वामनरावांनीं पुण्याचे मिशन स्कुलांत अभ्यास केला. ह्या शाळेंत बरींच वर्षें शिकणें झाल्यानंतर येथेंच १५ रु० दरमहावर यांस मास्तरचें काम मिळालें.

वामनरावजींनीं रोजगारास खरा आरंभ सन १८५५ मध्यें केला. या वर्षी कॅप्टन कौपरसाहेब यांचे इनाम कमिशनचे आफिसांत रा. ब. देशमुख व विष्णुपंत रानडे यांचे शिफारशीवरून यांस १५ रुपयांची नोकरी

लागली. येथें हे फार दिवस टिकले नाहींत. फक्त १।३ महिनेच होते. नंतर इंजिनियर स्पेशल ड्यूटी ऑफिस, पे ऑफिस, कमांडर-इन्-चीफचें ऑफिस, कराची कलेक्टर आफीस, कर्नल जेकबचें मिलिटरी नॉर्मल स्कूल वगैरे कचेऱ्यांतून एकामागून एक अशीं ५०।६० रुपयांपर्यंत रायटरचीं कामें वामनरावजीनीं केलीं. पुढें त्यांनीं १८६६ त हिंगणघाट येथें मे. डॉडस यांचे हाताखालीं रा. ब. देशमुखांचे शिफारशीवरून ८० रु. जिल्हा हेड मास्तर, अकोला येथें डा० सिंक्लेअर यांचे हाताखालीं आक्टिंग डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर व ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल, मलकापूर येथें अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलचे हेडमास्तर इ० मोठमोठालीं हुद्याचीं कामें वऱ्हाडप्रांताचे शाळाखात्यांत सवाशें रुपयांपर्यंत केलीं. शेवटीं १८७६ मध्यें यांनीं पेनशन घेतलें. पुढें ५।६ वर्षांनीं म्हणजे ता. ५ मे सन १८८२ मध्यें यांची पत्नी सौ० सत्यभामाबाई यांस देवाज्ञा झाली. पेनशन मिळाल्यापासून हे पुण्यांत येऊन राहिले आहेत. पेनशन घेतलें आहे तरी व वयोवृद्ध आहेत तरी फुरसतीचे वेळांत हे लोकोपयोगी कामें निरपेक्षबुद्धीनें व नेटानें करीत आहेत. पुणें

म्युनिसिपालिटींत ६ वर्षें ऑनररी डेप्युटी इन्स्पेक्टरचें काम यांनीं केलें आहे. यांना गाडीभाड्यासाठीं १५ रु० भत्ता मिळे. १८ मुलांच्या व १३ मुलींच्या अशा एकंदर ३१ शाळांची पहाणीतपासणी हे मोठ्या काळजीपूर्वक करीत. यांस सध्यां दरमहा सुमारें ४० रु. पेनशन मिळत आहे.

ह्याप्रमाणें वामनरावजींचा चरित्रक्रम आहे. कमजास्त गोष्टींची भर पडते एवढेंच, बाकी बहुतेक सर्व लोकांचा काळ—पहिला भाग शिकण्यांत, दुसरा भाग उदरनिर्वाहाच्या उद्योगांत व पूर्णविरामापूर्वी तिसरा भाग लाधल्यास आरामांत-असाच जात असतो. परंतु कोणीही मनुष्य चरित्रलेखनार्ह होण्यास त्याचे हातून एखादें परोपकाराचें व अलौकिक धैर्याचें सत्कृत्य घडावयास हवें असतें. एरवी कोणी चरित्रनायक वा नायिका बनत नाहीं. असलेंच अनुकरणीय कृत्य वामनरावांनीं बोलून नव्हे तर लखलखीत करून दाखविलें; सबब ते अखिल सुधारकवर्गास वंद्य होत. पुष्कळ सद्गृहस्थांस विधवा बहिणी घरांत नकोशा असतात असें नाहीं. पण दुःखीकष्टी अशा आपल्या अनाथ भगिनीस वैधव्यपं-

कांतून वर काढण्यास कोणास फारसें नको असतें. बहिणींची दुःखद स्थिति कित्येक बंधूंच्या अंशतः पथ्यावर पडते. तेव्हां त्यांस नाइलाजास्तव स्वहिताच्या गोष्टीस फांटा देतां येत नाहीं. पण अशी वामनरावांची गोष्ट नव्हती. आपल्याप्रमाणें इतरांसही दुःख नसावें ही त्यांची उत्कट इच्छा. ह्मणूनच यांनीं हें बहिणीच्या पुनर्विवाहाचें एक अद्वितीय सत्कार्य केलें. व तें २००० वर्षें पूर्वीं कधींही झालें नव्हतें. आरंभ करून प्रघात घालणेंच फार कठीण काम, तें ह्यांनीं पुष्कळ संकटें सोसून मोठ्या धैर्यानें केलें; ह्याबद्दल पुनर्विवाहित आणि पुनर्विवाहेच्छु स्त्रीपुरुषांनीं ह्यांचे जेवढे उपकार मानावे तेवढे थोडेच होत. अशाच अर्थाचें कै० कृष्णशास्त्री चिपळुणकर ह्यांनीं 'शालापत्रकांत' ह्मटलें आहेः "ही (विधवापुनर्विवाह) सुधारणा प्रवृत्त करण्याबद्दल ज्यांनीं मेहेनत घेतली त्यांनीं देशावर मोठा उपकार केला असें आह्मीं समजतों." असो; तर आतां ह्यांचे चरित्रांतील या अत्यंत उज्ज्वल भागाचें वर्णन करून हा अल्पचरित्र लेख आटपतों.

अकोला हायस्कुलांत फर्स्ट असिस्टंट मा-

स्तर असतांना ह्मणजे एप्रिल—मे १८६९ मध्यें वामनरावांनीं आपली विधवा भगिनी वेणुबाई इचें कोणा तरी योग्य वराबरोबर पुनर्लग्न करण्याची खटपट केली. मुंबईचे "इंदुप्रकाश" वर्तमानपत्रांत बहीण पुनर्विवाहास तयार असल्याबद्दल "पुनर्विवाहोत्तेजक मंडळी" मार्फत जाहिरात देववून वराचा शोध मागविला. पुनर्विवाहेच्छु वधूवरांची माहिती मिळविण्यास जाहिरातीवांचून अन्य मार्ग नाहीं. सुदैवानें ह्या वर्तमानपत्राचें चालकत्व वे. शा. सं. विष्णु परशराम शास्त्री पंडित यांचेकडे होतें. हे पुनर्विवाहपक्षाचे पुढारी; सबब असली जाहिरात ते संतोषानें आपल्या पत्रांत घेत. हल्लीं "सुधारक", "सुबोधपत्रिका", "मद्रास सोशल रिफार्मर" वगैरे वर्तमानपत्रें असल्या जाहिराती फुकट छापवून लोकमत सुधारण्याचें एक अतिशय मोठें कार्य करीत आहेत. असो. वर लिहिल्याप्रमाणें जाहिरातीद्वारें वराचा तपास चालविला. त्या वेळीं ह्मणजे आज ३० वर्षांपूर्वीं ब्राह्मणज्ञातींत प्रसिद्धपणें विधवेशीं पुनर्विवाह करणें फार दुरापास्त व कठीण काम होतें. पण अनाथ अबलावर्गाच्या सुदैवानें एक धैर्यवान पुरुष पुढें सरसावला. ह्याचें

नांव रा. पांडुरंग विनायक करमरकर. हे गृहस्थ खानदेशांत सावदे तालुक्यांत इंग्रजीमराठी शाळेवर मास्तर होते. ह्यांचा विद्याभ्यास पुण्यास झालेला होता. ह्यांनीं इंदुप्रकाश पत्रांतील जाहिरातीमधील विधवेशीं पुनर्विवाह करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. त्यावरून वामनरावांनीं त्यांस पत्र पाठवून अकोल्यास बोलावून घेतलें. तेथें तीन चार दिवस राहवून घेतलें. वर वधूचे मनास आला. वधू पसंत झाल्यावर रा. पांडुरंगपंत मुंबईस वे. विष्णुशास्त्री पंडित यांचेकडे गेले. ही गोष्ट मे ६९ मध्यें घडली. नंतर वामनराव आपलें कुटुंब सौ. सत्यभामाबाई व बंधु नारायणराव यांस बरोबर घेऊन मुंबईस गेले. तेथें पोंहोंचल्यावर यांनीं रा. ब. रानडे, प्रो. भांडारकर, वे. विष्णुशास्त्री पंडित वगैरे गृहस्थांच्या गांठी घेतल्या. सर्वांनुमतें पुनर्विवाहसमारंभ घडवून आणण्याचा नक्की बेत ठरला. इतक्यांत वेणुबाईचे सासरीं ही पुनर्विवाहाची बातमी पोंहोंचली. व कांहीं तरी विघ्न आणण्यासाठीं ह्मणा किंवा विनाकारण त्रास देण्यासाठीं ह्मणा, तिच्या सासरहून एक गृहस्थ तिचे अंगावरले दागदा-

गिने मागावयास आले. हे गृहस्थ मुंबईपासून कोठें ५।६ कोसांवर रहात होते. वामनरावजींनीं वेणुबाईचे दागिने ह्या सासरच्या माणसाच्या स्वाधीन करून त्यापासून जिनसा पोंहोंचल्याची पावती लिहून घेतली. ह्याप्रमाणें दागिने देऊन टाकून तंटा मिटविला. हेतु हा कीं, कार्यांत कोणताही घोटाळा नको. व ह्यांनीं स्वतःच्या पदरचे दोनतीनशें रुपयांचे वेणुबाईस दागिने दिले. कित्येक विरुद्ध पक्षकारांनीं वधूवरांस दुखापत करण्याची धमकी घातल्यावरून त्याचे मुचलके घेतले. शिवाय लग्नसमारंभाचे वेळीं दोनतीनशें पोलीस शिपाई रखवालीस घेऊन ठेविले. रा० ब० रानडे, डा० भांडारकर, रा० जनार्दनपंत गाडगीळ, विष्णुशास्त्री पंडित यांची लग्नापूर्वी ८ दिवस सारखी चर्चा चालली होती.

पुनर्लग्नाची मिती ज्येष्ठ शुद्ध ६ शके १७९१ (ता० १५ माहे जून १८६९) ही नेमिली होती. विवाहाचे आदले दिवशीं वामनरावांची पत्नी सौ० सत्यभामाबाई यांनीं पुनर्विवाहसमारंभास येण्याची नाखुषी दर्शविली. त्यांनीं भांडण काढिलें. त्या बोलल्या “ मी पुनर्विवाहसमारंभांत, खास सांगतें, साफ

येणार नाहीं." स्त्रियांस योग्य शिक्षण त्यावेळेस मुळींच न मिळाल्यामुळें इतर बायका आपणास हासतील ही यांस फार जबरदस्त भीति वाटत असे. ह्या कारणानें सौ॰ सत्यभामाबाईस समारंभांत आपलें अंग असणें बरें वाटेना. सबब यांनीं पुनर्विवाहास येण्याची गोष्ट नाकारली. परंतु वामनराव पडले मोठे दृढनिश्चयी व करारी. त्यांनीं कुटुंबास स्वच्छ सांगितलें "पुनर्विवाहास येण्याचें तुझ्या मनांत नसेल तर नको येऊस बापडी. तुझ्यावांचून मी कांहीं हें मंगलकार्य अडूं देणार नाहीं. मी बेलाशक कडुसरीस सुपारी लावून लग्न पार पाडीन, ठेवणार नाहीं." असें म्हणून त्यांस वामनरावांनीं कै. मोरोपंत वाळवेकर यांचे बिऱ्हाडीं पोंहोंचती केली. व वेणुबाईस सदाशिवराव गोंवंड्याचे जामात विष्णुपंत यांचे येथें ठेविलें. पण सौ॰ सत्यभामाबाईनीं आपल्या भर्त्यांचा कृतनिश्चय व करारी स्वभाव ताडिला. त्यांस कळून चुकलें कीं आपलें नाहीं म्हणण्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तेव्हां सरतेशेवटीं समारंभास येण्याची गोष्ट दुसरे दिवशीं सकाळीं कबूल केली. ह्याप्रमाणें सर्व अडचणी दूर हो-

ऊन सान्या गोष्टींची सिद्धता झाल्यावर ज्येष्ठ शु. ६ ला गोरजमुहूर्तावर प्रसिद्धपणें असा हा अगदीं पहिला पुनर्विवाह झाला. पुनर्विवाह सुधारणेच्या इतिहासांत ता० १५ जून ६९ हा दिवस अत्यंत महत्वाचा आहे. कारण ह्याच दिवशीं या शुभकार्यास खराखुरा आरंभ झाला ह्मणावयाचा.

पुनर्विवाहाचे वेळीं वधूचें वय १७ वर्षांचें होतें. वेणुबाईचा पहिला नवरा नवव्या वर्षीं ह्मणजे प्रथम लग्नानंतर अवघ्या आठ महिन्यांनीं निवर्तला. पांडुरंगपंताची उमर २५ वर्षांची होती. लग्नसमारंभ मुंबईंत गोवाळी तळ्यावरील रा. ब. मोरोबा कान्होबा यांचे बंगल्यांत झाला. ह्यांनीं ह्या वेळीं हंड्या झुंबरें वगैरे लावून खूप आरास केली. सुमारें २।३ शें रु. खर्च केले. लग्नसमारंभास दोनतीन हजार लोक जमले होते. भोजनास सुमारें ७५ मंडळी हजर होती. वे. शा. सं. सिद्धेश्वरशास्त्री आणि विष्णुशास्त्री पंडित यांनीं या पुनर्विवाहांत पौरोहित्य पत्करिलें. या समारंभाची साद्यंत हकीकत रा. ब. मोरोबा कान्होबा यांनीं मुंबईचें सुप्रसिद्ध इं-

ग्रजी वर्तमानपत्र जें "टाइम्स" त्यामध्यें उत्कृष्ट तऱ्हेनें दिली व कै. विष्णुशास्त्री यांनीं हाच आनंददायक समारंभ आपल्या "इंदुप्रकाश" पत्रांत फार सुरस रीतीनें वर्णिला आहे. इतका या थोर गृहस्थांस पुनर्विवाहकार्याविषयीं उत्साह वाटत असे. ह्याप्रमाणें परमेश्वरकृपेनें हें मंगलकार्य निर्विघ्नपणें शेवटास पोंहोंचलें. कार्य यथास्थितपणें उरकल्यावर वामनराव आपले पूर्वीचे रोजगारावर वऱ्हाडांत परत गेले. इकडे या प्रांतीं बहिणीचा पुनर्विवाह केल्यामुळें तिकडे वऱ्हाड प्रांतांत त्यांस अतिशय त्रास होऊं लागला. लोकांनीं ह्यांस नानातऱ्हेनें छळण्यास सुरवात केली. यांजवर मोठा गहजब लोटला. राहण्यास घर मिळेना. पाण्यास गेलेल्या बाया टकमका कौतुकानें व कोणी रागानें यांच्या कुटुंबाकडे पहात. साधारणतः एकंदर जनसमाज यांचा तिरस्कार करूं लागला. त्यांतही विशेषेंकरून भिक्षुकमंडळी फारच कंटाळा करूं लागली. एके दिवशीं वामनरावजी कै० रा० ब० श्रीरामपंत जठार यांचे घरीं बसले असतांना एक दोन भिक्षुक आले. यांनीं, वामनराव पुनर्विवाहपक्षांतले आहेत येवढें कळतां-

क्षणींच, ताडकन् आठदहा हात लांबवर उडी मारली, कीं न जाणों कदाचित् विटाळ होईल.

ह्या कार्यास रा० ब० रानडे यांनीं अतिशय मदत केली. अशी मदत कोणीं दिली नाहीं. रा०ब० रानडे वामनरावांपाशीं ५।१० रु० देऊन ठेवून पुनर्विवाहेच्छु स्त्रीपुरुषांचा शोध करवीत. त्यांचा पत्ता काढणें, त्यांस वरचेवर पत्रें धाडणें, मिळालेली वधूवरांची माहिती परस्परांचे पसंतीसाठीं पाठविणें, अशा तऱ्हेचें एक दप्तरी काम; आणि काम पडल्यास परगांवीं ह्याच कार्यानिमित्त जाणें येणें हें दुसरें. ह्याच दिशेनें काम करण्यास जर रावबहादुर द्रव्याची कायमची सहाय्यता अजूनही करतील तर हें सुधारणेचें कलम पुढें कालांतरानें बरेंच जोरावत जाईल, व त्याचा मोठा वृक्ष बनल्यास निराश्रित विधवांस आश्रयस्थान होईल. लग्नांत लोकांनीं चांदला केला त्याचे ३००० रुपये जुळले. ही रक्कम सौ० रखमाबाई (हें नवीन सासरचें नांव) यांच्या नांवें "पुनर्विवाहोत्तेजक मंडळी" नें बँकेंत ठेविली. ह्या बँकेंतील पैक्याचे कारभारी पर० बाळ मंगेश वागळे हे होते. या तीन हजारांची पुढें काय वाट झाली तें वामनरावांस कळलें नाहीं. ह्यानंतर पुढें

२।३ महिन्यांनीं ह्याच पुनर्विवाहामुळें पुण्यास श्री शंकराचार्यांसमक्ष १० शास्त्र्यांनीं मोठा थोरला वाद केला. त्या वादाचा इतिहास पहातां विधिपक्ष खरा ठरला असेंच जरी होतें तरी वामनरावांनीं आपल्या बहिणीचा पुनर्विवाह लाविला नसता तर पुढें कांहीं वर्षें हें शुभकार्य सुरू न होतें. त्या वेळच्या आरंभाचें बरेंच श्रेय वामनरावांस आहे.

वामनरावजी यांनीं बहिणीचा पुनर्विवाह करून बरीच घस्त सोसली. अनाथ अबलांच्या निमित्त अद्यापही द्रव्याची सहाय्यता यथाशक्ति करीत आहेत, आणि जीवांत जीव आहे तोंपावेतों ह्या पुनर्विवाहास मदत देत जाण्याचा त्यांचा निश्चय आहे. पण आपले पश्चात्सुद्धां ह्या कार्यास आपल्याकडून सदैव द्रव्याची मदत मिळत रहावी अशी कायमची व्यवस्था करण्याचा त्यांचा नक्की बेत ठरला आहे. हें कार्य हातीं घेऊन जी विधवाविवाहप्रतिबंधनिवारक मंडळी तत्प्रसारार्थ आज ६ वर्षें प्रयत्न करीत आहे त्या मंडळीचे चिटणीसांस त्यांनीं आपला हेतु लिहून कळविला आहे.

ह्या देऊं केलेल्या उदार देणगीबद्दल श्रीयुत वा-

मनराव परांजपे यांचे, अनाथ देशभगिनींच्या तर्फें, जितके आभार मानावेत तितके थोडे होत. पुनर्विवाहेच्छु एकाद्या गरीब विधवेचा दरसाल दोन महिने खर्च भागेल येवढी ही रक्कम आहे. ह्याप्रमाणें चार चार सहा सहा विधवांचा सदोदित खर्च निभेल अशा मोठमोठ्या देणग्या पुणें येथील विधवाविवाहप्रतिबंधकनिवारक मंडळीचे स्वाधीन करण्याची उदार धनिक लोकांस परमेश्वर सुबुद्धि देवो, येवढीच प्रार्थना आहे. ही अनाथ देशभगिनींच्या सुदैवानें सफल झाली, ह्मणजे चरित्रलेखनाचें बरेंच साफल्य झालें.

पत्यौ क्लीबे च पतिते नष्टे प्रव्रजिते मृते,
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते.

—पराशर—